मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

दैनिक

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ३१४ वा ● शुक्रवार, ता. २२ मे २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००



''दादा, पुस्तक नक्की वाचा.. यात शेरडं-करडांचे राजकारण आहे..'', माधुरीने असा डायलॉग नेमक्या वेळी फेकल्याने महाराष्ट्राचे लाडके मंत्री चंद्रकांत बच्चू पाटील यांच्यासह सगळेच हसले. पुणे बाल पुस्तक जत्रेत मंत्री पाटील यांनी स्टॉलला भेट दिल्यावर पुस्तक भेट देताना घडलेला किस्सा. (छायाचित्र : अभिजीत बारभाई)

# सर्वोच्च न्यायालयाचा मोठा झटका

## विदर्भातील ८६ हजार हेक्टर झुडपी जंगल वनक्षेत्र घोषित

### विदर्भातील वनभूमीला डिनोटिफाय करण्याचा निर्णय घेतला होता

**नागपूर । प्रतिनिधी**

विदर्भातील सहा जिल्ह्यातील झुडपी जंगलाला वनक्षेत्र घोषित करण्याचा महत्वपूर्ण निर्णय सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी दिला. राज्य शासनाने विदर्भातील ८६ हजार हेक्टर भूमीला डिनोटिफाय करण्याचा निर्णय घेतला होता. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे राज्य शासनाला मोठा झटका बसला.

याशिवाय झुडपी जंगलामधील १९८० नंतरच्या सर्व बांधकामांना अतिक्रमण ठरवत सर्वोच्च न्यायालयाने दोन वर्षात अतिक्रमण काढण्याचे निर्देश दिले. सरन्यायाधीश भूषण गवई आणि न्या. ए.जी. मसीह यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. १९६१ साली राज्यात ९.२३ लाख हेक्टर भूमी झुडपी जंगलक्षेत्रात येत होती. यापैकी ६.५५ लाख हेक्टर जमिनीला संरक्षित किंवा आरक्षित वनभूमीचा दर्जा दिला गेला. उर्वरित २.६८ लाख हेक्टर जमिनीपैकी ९२ हजार ११५ हेक्टर जमीन वनीकरणासाठी योग्य मानली गेली. एक लाख ७६ हजार हेक्टर जमिनीपैकी ८९ हजार ७६८ हेक्टर जमीन १९९२ पर्यंत गैरवनीय कार्यासाठी वळविण्यात आली. उर्वरित ८६ हजार ४०९ हेक्टर कायदेशीर वादात अडकली होती आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे हा वाद संपुष्टात आला. सर्वोच्च न्यायालयाने या जमिनीबाबत १२ डिसेंबर १९९६ रोजी दिलेल्या निर्णयाच्या धर्तीवर गुरुवारी निर्णय दिला आणि वनविभागाकडे जमीन हस्तांतरित करण्याचे निर्देश दिले. महाराष्ट्र शासनाने २०१४ ते २०१८ दरम्यान अनेक परिपत्रक काढत विविध विकासकामांसाठी जमिनीचा वापर बदलण्याचा प्रयत्न केला. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे राज्य शासनाच्या या प्रयत्नांना फटका बसला आहे.

निर्णयाचे मुख्य मुद्दे : १२ डिसेंबर १९९६ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली या सहा जिल्ह्यातील झुडपी जंगल वनक्षेत्र म्हणून परिभाषित. महसूल खात्याच्या अख्यारित असलेली वनभूमी खासगी संस्था, व्यक्ती यांना दिली आहे का? याची पडताळणी करण्यासाठी राज्याच्या मुख्य सचिवांनी विशेष पथक गठित करावे. अशाप्रकारची जमीन वनविभागाला परत करण्याबाबत राज्य शासनाने पावले उचलावी. सार्वजनिक हिताचा विचार करून जर हे शक्य नसेल तर संबंधित व्यक्ती, संस्थाकडून जागेचा शुल्क वसूल करावा आणि त्याचा वापर वनक्षेत्राचा विकास करण्यासाठी करावा. राज्य शासनाने संबंधित जागेचे स्वरुप भविष्यात कुठल्याही स्थितीत बदलणार नाही याची काळजी घ्यावी तसेच जिल्हानिहाय आराखडा तयार करावा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे उल्लंघन करून डिसेंबर १९९६ नंतर जमिनीचे स्वरुप बदलविण्याच्या प्रस्तावाचे कारण, प्रस्ताव तयार करणारे अधिकारी यांची नावे सादर करावी. संबंधित अधिकाऱ्यांवर वन संरक्षण कायदा, १९८० अंतर्गत कारवाई केल्यावरच केंद्राने प्रस्तावाबाबत पुढील निर्णय घ्यावा. संबंधित जमिनीवर पुढे अतिक्रमण होणार नाही याबाबत उपविभागीय यांनी काळजी घ्यावी, अतिक्रमण झाल्यास दंडाधिकाऱ्यांना जबाबदार धरले जाईल. ऑक्टोबर १९८० नंतर व्यावसायिक वापरासाठी झालेले सर्व अतिक्रमणच मानले जाईल. उपविभागीय दंडाधिकारी, पोलीस अधीक्षक, सहायक वनसंरक्षक, महसूल विभागाचा तालुका निरीक्षक यांची समिती गठित करून दोन वर्षाच्या कालावधीत अतिक्रमण निर्मूलनाची कारवाई करण्यात यावी. या अधिकाऱ्यांची नेमणूक केवळ या कार्यासाठी केली जाईल, त्यांना इतर कोणतेही कार्य दिले जाणार नाही.

## धर्मशास्त्र परंपरेला पुढे नेण्यासाठी श्रीहरी छत्रपती शिवाजी महाराज गुरुकुलाची स्थापना

### श्री मंजुनाथ भारती महास्वामी



**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

भारतीय अध्यात्मिक परंपरा जगाला प्रेरणादायी आहे. आपला देश धार्मिक क्षेत्रात अग्रेसर आहे. मात्र आधुनिक युगात धर्मशास्त्र आणि परंपरेचा र्हास होत चालला आहे. याच कडे लक्ष देऊन धर्मशास्त्र परंपरेला पुढे नेण्यासाठी मल्याळ येथे श्रीहरी छत्रपती शिवाजी महाराज गुरुकुल स्थापन करण्यात येत आहे..या कामात प्रत्येकाचे सहकार्य आणि योगदान महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन बेंगळुरू गोसावी मठाचे पिठाधीश मंजुनाथ भारतीय महास्वामी यांनी पत्रकार परिषदेत बोलताना केले.

यावेळी पुढे बोलताना मंजुनाथ भारती महास्वामी म्हणाले, आजच्या काळात भरकटलेल्या तरुण पिढीला जीवनाची दिशा दाखवण्यासाठी गुरुकुलांची नितांत आवश्यकता आहे. प्राचीन काळात ऋषीमुनींच्या कठोर साधनेतून आपणाला जीवनाचे ज्ञान प्राप्त झाले आहे. ऋषीमुनींच्या तपस्येमुळे ज्ञानाचे भांडार मिळाले आहे. प्रत्येकाच्या जीवनात अध्यात्माला मोठे महत्त्व आहे.मात्र आधुनिक युगात धर्मशास्त्र आणि परंपरा कमी होत चालली आहे. याकडे लक्ष देऊन,बेळगावपासून काही अंतरावर असलेल्या हल्याळ गावात पाच एकर प्रशस्त जागेत श्रीहरी छत्रपती शिवाजी महाराज गुरुकुलाची स्थापना करण्यात येत आहे . या गुरुकुलात भारतीय संस्कृती, धर्मशास्त्र, योग, संगीत कला अशा विविध विषयांचे ज्ञान दिले जाणार आहे. शिक्षणाबरोबरच संस्कार आणि शिस्तीचे धडे दिले जाणार आहेत.श्रीहरी छत्रपती शिवाजी महाराज गुरुकुलात पहिलीपासून ते उच्च शिक्षणापर्यंत सर्व समाजातील मुलांना मोफत शिक्षण देण्यात येणार आहे. या कामात समाजातील दानी व्यक्ती, लोकप्रतिनिधी यांचे सहकार्य मोलाचे आहे. प्रत्येकाने आपापल्या परीने गुरुकुलाच्या स्थापनेत आर्थिक सहकार्य करावे. असे आवाहनही मंजुनाथ भारती स्वामी यांनी केले. यावेळी मराठा समाज सुधारणा मंडळाचे माजी अध्यक्ष गोपाळ बिर्जे,सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष अनंत लाड तसेच मराठा मंदिर चे अध्यक्ष अप्पासाहेब गुरव उपस्थित होते.

3 या वर्षात यशस्वी पदार्पण
आमच्यासोबत आपला प्रवास सुखाचा होईल..
विराज ट्रॅव्हल्स
प्रवाशांच्या सहकार्यामुळे विराज ट्रॅव्हल्सची यशस्वी वाटचाल,
सर्व ग्राहकांचे आभार !
पंकज गुंदेचा 9822496664 9403448649



## २४ मे रोजी होणार फेस्ताकर मारियस फर्नांडिस दिन साजरा

**पणजी । प्रतिनिधी**

२४ मे रोजी दरवर्षी ''फेस्ताकर मारियस फर्नांडिस दिन'' साजरा करणार आहे. पणजी येथील गोवा कॉलेज ऑफ होम सायन्स येथे समावेशक पुरुमेंटाचेम महोत्सव आयोजित केला जाणार आहे. गोवा समावेशकता, वारसा आणि सामुदायिक भावनेच्या वार्षिक उत्सवासह मारियस फर्नांडिस - ज्यांना प्रेमाने फेस्ताकर म्हणून ओळखले जाते - यांच्या वारशाचा अधिकृतपणे सन्मान करेल. समावेशक आणि सुलभ पुरुमेंटाचेम महोत्सवाचा भाग म्हणून, पणजी येथील गोवा कॉलेज ऑफ होम सायन्स येथे शनिवारी ता. २४ मे रोजी सकाळी ११ ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत पहिला फेस्ताकर मारियस फर्नांडिस दिन होईल. पत्रकार परिषदेत, इतिहासकार प्राध्यापक प्रजल शकरदांडे यांनी समावेशकता, साधेपणा आणि लोकांना प्रत्येक उत्सवाच्या केंद्रस्थानी ठेवून गोव्यातील उत्सवांची पुनर्परिभाषा करणारे अग्रणी मारियस फर्नांडिस यांना श्रद्धांजली म्हणून वार्षिक उत्सव सुरू करण्याची घोषणा केली. ''हा फक्त एक उत्सव नाही,'' असे अपंगत्व समन्वयक प्रकाश कामत म्हणाले. ''ही एक चळवळ आहे. शारीरिक क्षमता, वय किंवा पार्श्वभूमी काहीही असो, गोव्याची संस्कृती सर्वांना उपलब्ध व्हावी याची खात्री करण्याबद्दल आहे.'' कार्यक्रमाचे ठळक मुद्दे दुपारी ४:३० पासून पुढे दुपारी ४:३० दीपप्रज्वलन ४:४५ पत्रकार परिषद ५:०० फेस्ताकर मारियस फर्नांडिस दिन आणि घुमोट वाढदिवसाच्या शुभेच्छा समारंभ, इतिहासकार प्रजल सकरदांडे यांचे फलकाचे अनावरण. सायंकाळी ५:१५ कोट्टियाचो नाच, मारियस फर्नांडिस यांनी संकल्पित केलेले आणि ग्वेन्डोलिन डी ऑर्नेलास यांनीकोरिओग्राफकेलेलेलोकनृत्य ५:३० डॉ. ग्लेनिस मेंडोन्का आणि ग्वेन्डोलिन डी ऑर्नेलास यांनी कोरिओग्राफ केलेले बोलकाओआंचियो गोझाल्ली ५:४५ मिगुएल ब्रागांझा यांच्यासोबत पुस्तकाचे प्रकाशन - लेखक डीन सुरेश कुंकलीकर आणि प्रोफेसर कार्मेलिटो अँड्रेड यांचे गोव्यात औषधी वनस्पतींचे उपचारात्मक चमत्कार, ग्वेन्डोलिन डी ऑर्नेलास यांनी प्रकाशित केलेले आणि फेस्टाकर मारियस फर्नांडिस यांना समर्पित. संध्याकाळी ६:०० वाजता कुलजीत भांगडा यांनी गोवा बीचवर रचना आणि राजवी नाईक आणि गटाने घुमट सादरीकरण संध्याकाळी ६:१५ वाजता डिझायनर हॅरोल्ड अँड्रेड यांचा सहभाग असलेले कुणबी ॲपेरल फॅशन शो संध्याकाळी ६:३० वाजता ग्लेनिस आणि रेनाल्ड मेंडोंका यांच्यासोबत कोकणी गाणी सिंगलॉन्ग ग्वेन्डोलिन डी ऑर्नेलास यांनी क्युरेट केलेले आणि डोमिनिक डिसोझा, प्रोफेसर कार्मेलिटो अँड्रेड आणि श्री प्रकाश कामत यांच्या समन्वयाने आयोजित केलेला हा महोत्सव गोव्यातील सांस्कृतिक कार्यक्रमांना समावेशक, सुलभ आणि सहभागी बनवण्याच्या सामायिक वचनबद्धतेचे प्रतिबिंबित करतो. प्रवेश विनामूल्य आणि सर्वांसाठी खुला आहे. कुटुंबे, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि समुदायातील सदस्यांना उपस्थित राहून गोव्यातील ओळख आणि एकतेचा मनापासून उत्सव अनुभवण्यास प्रोत्साहित केले जाते.

## जागतिक पातळीवर जैवविविधता संपन्न राज्य करण्याचा निर्धार- मुख्यमंत्री सावंत

**डिचोली । प्रतिनिधी**



ऐकेकाळी जैवविविधतेचा खजिना म्हणून ओळख असलेल्या गोव्यात आज जैवविविधतेतील अनेक दुर्मिळ गोष्टी नष्ट होताना दिसत आहेत. त्याचे संवर्धन व पुनर्जीवन करण्यासाठी राज्यातील प्रत्येक घटकांचे सहकार्य महत्त्वाचे असून गोवा राज्य जागतिक पातळीवर जैवविविधता संपन्न राज्य करण्याचा आमचा निर्धार असल्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी सांगितले. साखळी रवींद्र भवन येथे आंतरराष्ट्रीय जैवविविधता दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते. राज्यात सात ठिकाणी जैवविविधता केंद्र सुरू करण्यात आल्याची घोषणाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली. यावेळी व्यासपीठावर डॉ. श्रीधर ठाकूर, डॉ. अर्चना गोडबोले, सिद्धी प्रभू, लेवीन्सन मार्टिन्स, सचिन देसाई, जैवविविधता मंडळाचे सदस्य सचिव डॉ. प्रदीप सरमुकादम, संदीप फळदेसाई, विजयकुमार नाटेकर आदी मान्यवर उपस्थित होते. दुर्मिळ वनस्पती, वन्यजीव सांभाळणे गरजेचे आहे. गोव्यातील विविध भागात असलेले पुरातन कडधान्य, पालेभाजी, कंदमुळे, औषधी गुणधर्म असलेल्या वनस्पती या लोप पावत असल्याची भीती व्यक्त करताना त्याचे संवर्धन करण्यासाठी नव्या पिढीने विशेष योगदान देण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले. सह्याद्री परिसर हा जैवसंपदेचा मुकूट आहे. तो राखून ठेवण्यासाठी वेगवेगळ्या माध्यमातून अनेक मान्यवर काम करत आहेत. गोव्याच्या युवकांनीही त्यासाठी आपले योगदान देत असताना गोव्याच्या पारंपारिक जैविक संपदा राखून ठेवणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. सारा गोवा हरित व्हावा यासाठी वेगवेगळ्या माध्यमातून सरकारचे प्रयत्न सुरू असून मायनिंगचे डंपही हरित करण्यावर प्रयत्न सुरू आहेत. प्रत्येक तालुक्यात एका नव्या जैविक पदार्थाची ओळख व्हावी यासाठी ही आमचे प्रयत्न असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. राज्यातील मिठागरे नव्याने सुरू करण्याचा घोषणा मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली.तसेच गोव्यात ॲग्रो क्लिनिक जून पासून सुरू होणार असल्याची मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. भावी पिढीसाठी निसर्ग जपून ठेवणे गरजेचे असून जैवविविधतेच्या माध्यमातून निसर्गाचे संतुलन राखण्यासाठी प्रत्येक गोमंतकीयांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी राज्यातील विविध क्षेत्रात जैवविविधता संवर्धनासाठी काम करणाऱ्या मान्यवरांना जैवविविधता पुरस्काराने मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गौरवण्यात आले. गोव्याच्या जैविक संपत्तीचे दर्शन घडवणाऱ्या विशेष प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते, त्यालाही मोठा प्रतिसाद लाभला.

# मोर्चेकऱ्यांची काळजी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी घेतली

## सकल मातंग समाजाच्या पाठीशी मी खंबीरपणे उभा- उपमुख्यमंत्री शिंदे

**मुंबई । प्रतिनिधी**



सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार महाराष्ट्रात आरक्षण उपवर्गीकरण तात्काळ लागू करावे, या मागणीसाठी सकल मातंग समाजाच्या वतीने मुंबईतील आझाद मैदानावर भव्य जनआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले. यासाठी अहमदनगर जिल्ह्यातून चंद्रकांत काळोखे, सागर खरे, बाळासाहेब लोंढे, विजय शिंदे आदींसह मोठ्या संख्येन कार्यकर्ते गेले लाखाच्या संख्येत आलेल्या तमाम मोर्चेकऱ्यांचे खाण्यापिण्याचे हाल होणार नाही याची काळजी माजी मुख्यमंत्री तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतली. त्यांनी स्वतः लक्ष देवून भोजन, पाण्याची व्यवस्था केली.लयासाठी त्यांचे खास कार्यकर्ते राजाभाऊ मानकरल(राष्ट्रीय मातंग स्वाभिमानी संघटना-राष्ट्रीय अध्यक्ष), दिलीप यादव, रमेश दोडके, गजानन वानखेडे, ॲड. नितीन चांदणे, संजय चांदणे, अनिल सुरळकर, सिताताई चांदणे, यमुनाबाई भालेराव, ॲड. कांचन चांदणे आदी कार्यकर्ते मोर्चेकरांना आपुलकीने व आग्रहाने अन्नवाटप करीत होते. जाताना या सर्वांनीच लांबलांबुन आलेल्या मंडळीना शिदोरी घेवून जाण्याचा आग्रह केला तर पिण्याच्या पाण्याची बाटलींचे बॉक्सच्याबॉक्स प्रवासात अडचण होऊ नये म्हणून आग्रहाने दिले. हे सर्व बांधवांना खुपच समाधानकारक वाटले. ही महाभोजनव्यवस्था एकनाथ शिंदे विशेष सहयोगाने केली गेली होती. व्यवस्थापक टिमशी मनमोकळ्या गप्पा केल्यानंतर ही माहिती मिळाली. उपमुख्यमंत्री शिंदेंचे हे योगदान सर्वच मोर्चेकरांच्या मुखी होते. तसेच ''माझ्या महाराष्ट्रातील सकल मातंग समाजाच्या पाठीशी मी खंबीरपणे उभा आहे.'' मंडपामधील फलकावरील हे वाक्य प्रत्येकजण आवर्जून वाचत होता. तमाम मोर्चेकरांच्या वतीने शिंदे साहेबांचे आभार व्यक्त केले व त्यांना धन्यवाद दिले. ''अन्नदाता सुखीभव!'' ही प्रतिक्रिया सर्वांच्या वतीने एका वाक्यात व्यक्त केली, अशी माहिती क्रांतीगुरू लहुजी साळवे स्मारक समितीचे सदस्य चंद्रकांत काळोखे यांनी दिली. आमदार अमित गोरखे यांनी मंडपात बसलेल्या बांधवात जाऊन हातात हात घेवुन त्यांची चौकशी केली तर आमदार सुनिल कांबळे यांनी मोर्चेकरी यांचे शेजारी बसुन गप्पा केल्या. दोन्ही आमदारांनी कार्यकर्त्यांना भेटुन चौकशी केली.लदोघांसोबत फोटो व सेल्फी काढण्यासाठी युवक-युवती धडपड करत होती, तर त्यांना थांबवून फोटो काढण्यास दोन्ही आमदारांनी प्रतिसाद दिल्याने फोटो घेणारांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता.

# रयत समाचार Classified छोटी जाहिरात

## छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री | नोकरी विषयक | नावात बदल
आरोग्य विषयक | वाढदिवस | विवाह विषयक

**भाड्याने देणे**

परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.

**- संपर्क -**
**८८८८३४७४११**

**निसार Art**

सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट

7020356335 | 9860830016

पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.



**मे. रुपाली एजन्सी**

फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स

राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.
(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०
ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द

**जगदंबा टी सेंटर**

चहा, कॉफी, लेमन टी

शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर

प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com **(वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)**

# दिव्यांगांच्या समस्यांबाबत रेल्वे विभागाला निवेदन

**श्रीरामपूर । संदीप पाळंदे**

अपंग सामाजिक कल्याण व पुनर्वसन संस्था श्रीरामपुर तसेच आधार दिव्यांग संघटना महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने पुणे डिव्हीजन अंतर्गत धावणाऱ्या रेल्वे गाड्यांमध्ये दिव्यांगांना वारंवार मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. अनेक दिव्यांगांच्या तक्रारी, रेल्वेतील विचित्र अनुभव अशा विविध समस्याबाबत संघटनेकडे वारंवार तक्रारी येत असल्याने त्याच्यावर उपाय योजना करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मण खडके यांच्या मार्गदर्शनाखाली निवेदन देण्यात आले.

केंद्र शासनाने दिव्यांग हक्क अधिकार अधिनियम २०१६ पारीत करून दिव्यांगांना समाजात सहजतेने व सुलभतेने वावरता यावे म्हणुन स्पष्ट आदेश दिलेले आहेत. मात्र श्रीरामपूर येथील बेलापूर रेल्वे स्टेशनवर दिव्यांगांसाठी पुरेशा सोयी सुविधा नाहीत. दिव्यांगांना प्लॅटफॉर्मवर वावरण्यासाठी पुरेषा व्हिलचिअर नाही. प्लॅटफॉर्म बदलण्यासाठी दादरवर रॅम्पची व्यवस्था नाही. एका प्लॅटफॉर्मवरून दुस-या प्लॅटफॉर्मवर जाण्यासाठी शहरातील चौकातुन फिरून जावे लागते. प्लॅटफार्म दोनवर ही रॅम्पची व रस्त्याची व्यवस्था नाही. स्टेशनवर दिव्यांगांसाठी विशेष स्वच्छतागृहे, शौचालये नाहीत.



केंद्र शासनाच्या आदेशानुसार रेल्वेत दिव्यांग प्रवाशांसाठी एक विशेष बोगी आरक्षित केलेली आहे. मात्र दिव्यांग नसलेले प्रवासी, भिक्षुक, महिला, चोर, भामटे, लहान मुले, वयोवृध्द आदी अनधिकृतरित्या बसुन खऱ्या दिव्यांगांना सीटही देत नाही. दरवाज्यात बसुन दिव्यांग प्रवाशांना डब्यात येवूनही देत नाही. तर काही दरवाजा बंद करून घेतात. दिव्यांग आरक्षीत डब्याची प्रत्येक रेल्वे स्टेशनवर सुरक्षा बलाकडुन तपासणी करावी. तसेच दिव्यांग प्रवाशांना रेल्वे विभागाने कडक सुरक्षा देणे बंधनकारक आहे असेही निवेदनात म्हटले आहे.

यावेळी आधार दिव्यांग संघटनेचे संपर्क प्रमुख राम डमाळे, भारत चौधरी, सुमित रहीले, रविंद्र करपे, विष्णु पाठक आदी दिव्यांगांसह रेल्वे प्रबंधक पांडे व रेल्वे सुरक्षा बलाचे हे कॉ. डी. शैलेश उपस्थित होते.



## शिक्षण हे केवळ गुणांपुरते मर्यादित नसून ते व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी साधन- डॉ. आर. जे. बार्नबस

### विद्यापीठ परिक्षेत बीसीएस विद्यार्थ्यांचे यश

**अहमदनगर । प्रतिनिधी**

अहमदनगर महाविद्यालयाच्या एफ. वाय.बी.सी.एस. (प्रथम वर्ष बॅचलर ऑफ कॉम्प्युटर सायन्स) विभागातील विद्यार्थ्यांनी नुकत्याच झालेल्या विद्यापीठाच्या परिक्षेत उल्लेखनीय यश मिळवले आहे. गुणवत्तेच्या निकषांवर आधारित या निकालात विद्यार्थ्यांनी उच्च श्रेणी प्राप्त करून महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले आहे. या परीक्षेमध्ये खान अज़ीम मुनाफ याने ९.७३ गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्याचबरोबर रुद्रप्रताप सिंग (९.६४ गुण), अभिनव बाबासाहेब लोंढे (९.५५ गुण) आणि गवळी तेजस कानीफनाथ (९.५५ गुण) यांनीही उत्तम गुण मिळवत गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल प्रभारी प्राचार्य डॉ. नोएल पारगे यांनी समाधान व्यक्त केले. त्यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या अथक परिश्रमासोबतच प्राध्यापकांच्या मार्गदर्शनामुळे हे यश शक्य झाले आहे. भविष्यात देखील असेच यश मिळावे यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. बी.पी.एच.ई. सोसायटीचे अध्यक्ष डॉ. आर. जे. बार्नबस यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, शिक्षण हे केवळ गुणांपुरते मर्यादित नसून ते व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रभावी साधन आहे. या गुणवंत विद्यार्थ्यांनी इतरांसाठी प्रेरणा निर्माण केली आहे. त्यांचे भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा! यावेळी विभागप्रमुख प्रा. दिलीपकुमार भालसिंग आणि डॉ. सय्यद रज्जाक हेही उपस्थित होते. त्यांनीही विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



## संजीवनी इंजिनिअरींगच्या ९ विद्यार्थ्यांची नोकरीसाठी निवड

**कोपरगाव । किसन पवार**

आपला पाल्य या महाकाय विश्वात स्थिरस्थावर व्हावा, स्वावलंबी व्हावा, त्याला नोकरी मिळावी, ही पालकांची माफक अपेक्षा असते. या अपेक्षेने पालक आपल्या पाल्यांना इंजिनिअरींग कॉलेज मध्ये दाखल करतात. संजीवनी कॉलेजचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट डिपार्टमेंट विविध कंपन्यांच्या संपर्कात राहुन कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करते. अशाच प्रयत्नातुन अलिकडेच किर्लोस्कर न्युमॅटिक कंपनीने चार व बिझिनेस नेक्स्ट कंपनीने पाच विद्यार्थ्यांची चांगल्या वार्षिक पॅकेजवर नोकरीसाठी निवड केली आहे. अशा प्रकारे संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजने आपल्या विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांमध्ये नोकरी मिळवुन देण्याचा ध्यास कायम ठेवला असुन पालकांचे स्वप्न पुर्ण होत आहे, अशी माहिती महाविद्यालयाने प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

किर्लोस्कर न्युमॅटिक या यांत्रिकी उत्पादनाच्या क्षेत्रातील आघाडीच्या कंपनीने मेकॅनिकल इंजिनिअरींगच्या अंतिम वर्षातील क्रिष्णा संजय राऊत, सहर्ष उमेश गुंजाळ, ऐश्वर्या मनोज कुंभार व कार्तिक राजेंद्र पवार यांची नोकरीसाठी निवड केली. बिझिनेस नेक्स्ट या जगभरातील बँका आणि वित्तिय संस्थांना सॉफ्टवेअर सपोर्ट करणाऱ्या कंपनीने अंतिम वर्षातील कॉम्प्युटर इंजिनिअरींगच्या ऋतुजा शिवाजी बेंद्रे, देवांशी लोकेश गुप्ता, इन्फर्मेशन टेक्नॉलॉजीच्या स्वराज शशिकांत लांडे, अक्षदा सोमनाथ चव्हाण व इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर इंजिनिअरींगच्या ऋषिकेश भाऊसाहेब दुबे यांची नोकरीसाठी निवड केली आहे.


निवड झालेले सर्व विद्यार्थी ग्रामीण भागातील आहे. संजीवनीच्या प्रयत्नाने ग्रामीण विद्यार्थी नोकरदार बनत आहेत. यामुळे पालक वर्गात मोठे समाधान आहे. अनेक पालक व्यवस्थापन, डायरेक्टर व संबंधित विभाग प्रमुख आणि शिक्षकांना भेटून महाविद्यालयाच्या प्रयत्नांबद्दल आपला अभिप्राय व्यक्त करतात. संजीवनीच्या सर्वच संस्था विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी कृतिबध्द कार्यक्रम राबवितात, त्यामुळे 'संजीवनी पॅटर्न' पालकांना अधिक भावत आहे, असे पत्रकात शेवटी म्हटले आहे.

संजीवनीचे अध्यक्ष नितिन कोल्हे व मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांनी सर्व निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन करून विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## आत्मा मालिकचा करण चरवंडे राज्यात प्रथम

**कोपरगाव । किसन पवार**


पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषद व आर टी एस सी फाउंडेशन यांच्यावतीने घेण्यात येणाऱ्या रॅशनॅलिस्ट टॅलेंट सर्च परीक्षेमध्ये आत्मा मलिक सेमी इंग्लिश मीडियम गुरुकुलाने सलग चौथ्या वर्षी राज्यात प्रथम येण्याचा मान मिळवला. करण चरवंडे याने राज्यात प्रथम तर श्रेयश भवर जिल्ह्यात प्रथम व तन्वेष भोये याने जिल्ह्यात तृतीय क्रमांक पटकावला आहे. आत्मा मालिक सेमी इंग्लिश मीडियम गुरुकुल, कोकमठाण सर्व स्पर्धा परीक्षांसह, प्रवेश परीक्षा, प्रज्ञाशोध परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये राज्यात अव्वल स्थानावर असून ही



केवळ शाळा नाही तर ही एक विद्यार्थ्यांचे गुणवत्तापूर्ण, सुसंस्कारित, सर्वगुणसंपन्न, सर्वांगसुंदर व्यक्तिमत्त्व घडविणारी तपोभूमी आहे असे प्राचार्य निरंजन डांगे यांनी सांगितले. या सर्व विद्यार्थ्यांना प्राचार्य निरंजन डांगे, विभाग प्रमुख सचिन डांगे, पर्यवेक्षक गणेश रासने, विषय शिक्षक राजेंद्र जाधव, पंकज गुरसळ, सुवर्णा ढगे, विद्या खोसे, रीना कोरे, भैरवनाथ कुंभार यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे ट्रस्टचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी, उपाध्यक्ष बाळासाहेब गोरडे, सरचिटणीस हनुमंत भोंगळे, कोषाध्यक्ष विठ्ठल होन, विश्वस्त प्रकाश गिरमे, प्रदीप कुमार भंडारी , शालेय व्यवस्थापक सुधाकर मलिक, वसतीगृह व्यवस्थापक साईनाथ वर्पे आदिंनी अभिनंदन केले.

## दा.भि. गायकवाड गुरूजी यांचा १३ वा स्मृतिदिन

### कार्यातून समाजप्रबोधनाची प्रेरणा



**अहमदनगर । प्रतिनिधी**

सिद्धार्थनगर येथील पंचशिल विद्यामंदिर प्राथमिक शाळेचे संस्थापक व माजी मुख्याध्यापक, तसेच फुले-शाहू-आंबेडकर-साठे चळवळीतील सक्रिय मार्गदर्शक दा.भि. गायकवाड गुरूजी यांच्या १३ व्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शनिवार, ता. २४ मे २०२५ रोजी सकाळी ११ वाजता, सिद्धार्थनगर (अहमदनगर) येथील पंचशिल विद्यामंदिर प्राथमिक शाळेच्या प्रांगणात संपन्न होणार आहे. गायकवाड गुरूजी हे केवळ शिक्षक नव्हते, तर ते सामाजिक परिवर्तनाचे कार्यकर्ते होते. शिक्षणाच्या माध्यमातून बहुजन समाजाला सक्षम करण्याचा त्यांनी अविरत प्रयत्न केला. त्यांच्या नेतृत्वात पंचशिल विद्यालय शिक्षण व मूल्यांची पाठशाळा ठरले. समाजात असमानतेविरुद्ध त्यांनी आवाज उठवला आणि अनेक विद्यार्थ्यांना नवदिशा दिली. ते संपादक भैरवनाथ वाकळे यांचे गुरु होते. कार्यक्रमासाठी सर्वांना उपस्थित राहण्याचे आवाहन गायकवाड गुरूजींच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या कार्याला उजाळा देत सामाजिक सलोखा, समतेचा संदेश देण्यासाठी या कार्यक्रमात समाजातील सर्व स्तरातील नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन जयंत गायकवाड व सुमेध गायकवाड यांनी केले आहे.

## राष्ट्रीय अंधत्व निवारण समन्वय समिती अध्यक्षपदी जालिंदर बोरुडे

**अहमदनगर । प्रतिनिधी**



राष्ट्रीय अंधत्व निवारण समन्वय समितीच्या महाराष्ट्र राज्याचे अध्यक्षपदी अहिल्यानगर येथील नेत्रदूत जालिंदर बोरुडे यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीची घोषणा समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष हेमंत रानडे यांनी केली. जालिंदर बोरुडे हे गेल्या ३२ वर्षापासून अहिल्यानगरसह महाराष्ट्रात नेत्रदान चळवळ प्रभावीपणे राबवित आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांची महाराष्ट्र राज्याचे अध्यक्षपदी निवड केली असल्याची माहिती संस्थेचे सचिव यशवंत भोसले यांनी दिली. लवकरच संपूर्ण महाराष्ट्रभर या संघटनेची कार्यकारणी जाहीर करण्यात येणार असून, महाराष्ट्रात प्रभावीपणे नेत्रदान चळवळ राबविण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे उपाध्यक्ष अभय कुलकर्णी यांनी दिली. बोरुडे यांच्या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



## रस्ता सुशोभीकरणासाठी उपोषणाचा इशारा

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

रस्ते सुशोभीकरण अंतर्गत श्रीगोंदा नगरपरिषद हद्दीतील १७ पैकी १६ रस्त्यावरील डिव्हाडर मध्ये माती भरून त्यात झाडे लावण्यात आली असताना सावतानगर कडे जाणाऱ्या बाबुर्डीरस्त्याकडे मात्र नगरपालिका प्रशासनाने दुर्लक्ष केले आहे. बाबुर्डी रोडवरील डिव्हायडर अस्थाव्यस्त अवस्थेत पडलेले असुन काही ठिकाणी ब्लॉक बसविलेले नाहीत. डिव्हायडरमध्ये मोठ मोठे काट्यांची झाडे व अन्य प्रकारचे झाडे उगवलेली असुन ते रस्त्यावर पसरली आहेत. काट्याच्या रस्त्यावर येत असल्याने नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळ्याचे दिवस सुरू होत आहे तरी वरील बाबींचा गांभीर्यपूर्वक विचार करून लवकरात लवकर काम चालू करण्यात यावे व आमच्या मागणीचा विचार न केलेस आम्ही ग्रामस्थ ता. ०९ जून २०२५ रोजी आपले श्रीगोंदा नगरपरिषद कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसणार असून होणाऱ्या परिणामाची सर्वस्वी जबाबदारी शासनावर राहील. आमच्या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून लवकरात लवकर काम सुरू करण्यात यावे याआशयाचे निवेदन किरण बनसुडे,मयुर बनसुडे यांनी मुख्याधिकारी पुष्पगंधा भगत , पोलीस निरीक्षक व तहसीलदार यांना दिले आहे. निवेदनावर आशिष बनसुडे, अक्षय शिवाजी जगधने,स्वप्निल डोके, सागर पोपट खेतमाळीस, युवराज तांबे,संदिप बोरुडे , सुधीर खेडकर , माधव बोरुडे, कांतीलाल कोकाटे ,शिवाजी शंकर राऊल ,अक्षय जालिंदर शेंडगे, अजिक्य वऱ्हाडे, सागर खेतमाळीस, पोपट जाधव ,आकाश बाळासहिब शिंदे, रोहित राजू देवकर, अनिल खेतमाळीस, सागर संपत साळुंके,वैभव अनिल बनसुडे , संकेत बनसुडे, रविकुमार डाके,संतोष तात्या खेतमाळीस यांच्यासह प्रभागातील नागरिकांच्या सह्या आहेत.

## नवीन जोडप्याच्या हस्ते वृक्षारोपण विवाह सोहळ्याला पर्यावरणाची जोड

**अहमदनगर । प्रतिनिधी**

जय हिंद फाउंडेशनच्या वतीने एक अभिनव उपक्रम राबवत निर्मलनगर येथे विवाहानिमित्त ११ झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. वैभव संजय आव्हाड आणि निकिता यांचा विवाह सोहळा नुकताच पार पडला. या सोहळ्याला केवळ पारंपरिक स्वरूप न देता पर्यावरण संवर्धनाची जोड देत, आंबा, आवळा, लिंब अशा ११ झाडांचे वृक्षारोपण या नवविवाहित जोडप्याच्या हस्ते करण्यात आले. या उपक्रमात परिसरातील अनेक मान्यवर आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदवला. यावेळी जय हिंद फाउंडेशनचे शिवाजी पालवे, बबनराव पालवे,



जगन्नाथ जावळे, दिनकर गिते, ज्ञानदेव चेमटे, संजय सानप, सुरेश दहिफळे, बाबासाहेब आव्हाड, मोहनराव आव्हाड, अश्रुबा पालवे, अर्जुन बडे, बळवंतराव पालवे, निवृत्त पोलीस अधिकारी श्याम जावळे, हरिश्चंद्र बडे, पप्पू गिते, राजेंद्र शेकडे, जय भगवान महासंघाचे संजय आव्हाड, सुमित डमाळ, ज्ञानेश्वर बडे, भारती डमाळ, ओंकार काकडे, पूनम खेडकर, शितल बुधवंत, आशा आव्हाड, रंजना बडे, पूजा दहिफळे आदी उपस्थित होते. विवाह सोहळ्यासारख्या आनंदाच्या प्रसंगी झाडे लावून तो दिवस संस्मरणीय बनवण्याचा संदेश या उपक्रमातून दिला गेला. जय हिंद फाउंडेशनने राबवलेल्या या उपक्रमाचा आदर्श घेऊन जिल्ह्यातील प्रत्येक गावात नवविवाहित जोडप्यांच्या हस्ते झाडे लावण्यात यावीत, असे आवाहन यावेळी करण्यात आले. शिवाजी पालवे यांनी पावसाळा लवकर सुरू होत असल्याचे सांगून अधिकाधिक वृक्ष लागवड करण्याचे आवाहन केले. वृक्ष लागवड ही केवळ निसर्ग रक्षणाचे साधन नसून, भावी पिढ्यांसाठी शुद्ध हवा, पाणी आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्याचा एक प्रभावी मार्ग असल्याचे त्यांनी सांगितले. रवींद्र शेकडे यांनी जय हिंद फाउंडेशनच्या पर्यावरण पूरक उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. नवविवाहित जोडप्यांनी अशा हरित उपक्रमात सहभागी होऊन आपल्या गावांना व परिसराला नंदनवनात रूपांतरित करावे. निसर्गाच्या सानिध्यात आनंदी जीवन जगता येणार असून, पर्यावरणाचे प्रश्न देखील सुटण्यास मदत होणार असल्याचे, ते म्हणाले. आभार माजी सैनिक बबन पालवे यांनी मानले.

# जागतिक कासव दिन

२३ मे हा दिवस संपूर्ण जगात जागतिक कासव दिन म्हणून साजरा केला जातो. १९९० पासून हा दिवस संपूर्ण जगात साजरा केला जातो. आपल्या संस्कृतीत कासवाला खूप मानाचे स्थान आहे. हिंदू संस्कृतीत तर कासवाला देवाचे रूप मानले जाते. हिंदू धर्माच्या मंदिराच्या बाहेर तर कासवाची प्रतिकृती आवर्जून असते. देवाचे दर्शन घेण्याआधी भाविक कासवाचे दर्शन घेतात. आपले पूर्वज कासवाचा सांभाळ करत असत. प्रत्येक नदी, विहीर, बारव तलावात कासव वास्तवात असे, पण आज कासवाचे अस्तित्व पणाला लागले आहे. कारण शिकार, व्यापार आणि पाण्याच्या अभावामुळे कासवाचे अस्तित्व पणाला लागले आहे. अनेक दुर्मिळ जातींच्या कासवांचे अस्तित्व नष्ट झाले आहे. आज गोड्या पाण्यातून तर कासवे हद्दपारच झाले आहेत. कासवांचे अस्तित्व आता फक्त समुद्रातच पाहायला मिळते. कासव हा उभयचर प्राणी आहे. पाणी आणि जमीन अशा दोन्ही ठिकाणी कासव राहू शकतो. कासवाचे पोट आणि पाठ खूप टणक असते. समुद्रात राहणाऱ्या कासवाचे सात प्रकार आहेत त्यापैकी भारतात चार प्रकार पाहायला मिळतात. ऑलिव्ह रिडले कासव, ग्रीन टर्टल, हॉक्स बिल टर्टल आणि आणि सागरी कासव हे ते चार प्रकार आहेत. ऑलिव्ह रिडले कासव हे तपकिरी रंगाचे असून ते महाराष्ट्र आणि ओरिसाच्या समुद्रकिनाऱ्यावर आढळतात. ग्रीन टर्टल कासव म्हणजे हिरव्या रंगाचे कासव हे पूर्व आणि पश्चिम किनाऱ्यावर आढळतात. हॉक्स बिल टर्टल म्हणजे चोची सारखे तोंड असलेले कासव अंदमान निकोबारच्या बेटावर आढळतात तर सागरी कासव हे सर्व समुद्रात आढळतात. समुद्रातील कासवांची देखील आता मोठ्या प्रमाणात शिकार होऊ लागली आहे. कासवांच्या पाठीचा दागिन्यांसाठी वापर केला जातो. तसेच कासवांच्या पाठिपासून ढालीही बनवल्या जातात. चामड्याच्या तसेच शोभेच्या वस्तू बनवण्यासाठी कासवांच्या त्वचेचा वापर केला जातो. काहीजण आपल्या घरात शोभेसाठी कासव पाळतात. या सर्व कारणांनी कासवांची शिकार होते. कासवांची शिकार बेकायदेशीर असूनही कासवांची शिकार होते हे विशेष. कासवांचे संवर्धन करण्यासाठी वेळास येथे कासव संवर्धन केंद्र उभारण्यात आले आहे. वेळास येथे दरवर्षी कासव महोत्सवही आयोजित केला जातो.



सिंधुदुर्ग जिल्ह्यात ऑलिव्ह रिडले कासवांचे प्रजनन आणि संवर्धन होते. कासवांचे आयुष्य १०० ते १५० वर्ष इतके असते. मात्र शिकारीमुळे अनेक कासवे अकालीच मरण पावतात. कासवांचे अस्तित्व जमीन आणि पाण्यातील जीवनसाखळीसाठी अत्यंत महत्वाचे आहे. कासवांचे अस्तित्व टिकणे ही काळाची गरज आहे. जर पृथ्वीवरून कासवांचे अस्तित्व नष्ट झाले तर त्याचा पर्यावरणावर मोठा परिणाम होऊ शकतो. कासव हा वन्यजीव असल्याने त्याला घरात बंदिस्त करणे, त्याची हत्या करणे, शिकार करणे हे वन्यजीव कायद्यानुसार गुन्हे आहेत त्यामुळे असे गुन्हे करताना कोणी आढळल्यास त्याची पोलिसांकडे तक्रार करणे हे देशातील नागरिकांचे कर्तव्य आहे. कायद्याचे अस्तित्व टिकवण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणे, कासवांचे संरक्षण आणि संवर्धन करणे हाच जागतिक कासव दिन साजरा करण्यामागचा उद्देश आहे. हा उदेश यशस्वी व्हावा असे वाटत असेल तर प्रत्येकाने कासवांचे संरक्षण आणि संवर्धन करायला हवे.



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५
समाजसंवाद



# न्यायमूर्तींबाबत राजशिष्टाचार पाळला जाऊ नये हे खेदजनक- ॲड. लगड

## जिल्हा बार असोसिएशनच्या वतीने निषेधाचा ठराव

**अहमदनगर । प्रतिनिधी**

सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी त्यांच्या मुंबई भेटी दरम्यान सरकारी अधिकाऱ्यांकडून राजशिष्टाचाराचे पालन न झाल्याबद्दल जिल्हा न्यायालयात अहमदनगर बार असोसिएशनच्या वतीने निषेधाचा ठराव घेण्यात आला.

विशेष सरकारी वकील ॲड. सुरेश लगड यांच्या अध्यक्षतेखाली बार असोसिएशनने तातडीची बैठक बोलवली होती. यामध्ये सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या भेटी दरम्यान राजशिष्टाचाराचे पालन न करणाऱ्या अधिकाऱ्यांचा निषेध करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी असा ठराव संमत करण्यात आला.

ठराव ॲड. महेश काळे यांनी मांडला. त्याला बारच्या वतीने ॲड. रफिक बेग यांनी अनुमोदन दिले. यावेळी ॲड. राजेश कावरे, माजी उपाध्यक्ष ॲड. राजाभाऊ शिर्के, ॲड. रावसाहेब बर्डे, ॲड. पी.डी. शहाणे, ॲड. हाजी रफिक बेग,ॲड. रामेश्वर कराळे, ॲड. ज्ञानेश्वर दाते, ॲड. आनंद सूर्यवंशी, ॲड. महेश काळे, ॲड. रघुनाथ शेळके, ॲड. वरद शिंदे, ॲड. अशोक पालवे, ॲड. समीर शेख, ॲड. संजय दराडे, ॲड. सतीशचंद्र सुद्रिक, ॲड. योगेश थोरात, ॲड. साबीर सय्यद, ॲड. बाबासाहेब रणसिंग, ॲड. व्ही.एस. शिंदे, ॲड. संजय दुशिंग, ॲड. अमित गाडेकर, ॲड. अभिषेक पगारिया, ॲड. सुरेश भोर आदींसह वकील मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

न्यायमुर्ती भूषण गवई हे महाराष्ट्रातील एकमेव न्यायमूर्ती असून, त्यांची एवढ्या मोठ्या उच्च पदावर सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती होणे ही सर्व महाराष्ट्रासाठी भूषणावह बाब आहे. एवढ्या मोठ्या उच्च पदस्त न्यायमूर्तींबाबत राज शिष्टाचार पाळला जाऊ नये, ही बाब अत्यंत खेदजनक आहे. राज शिष्टाचार न पाळणाऱ्या सर्व संबंधित अधिकारी यांना दोषी धरून त्यांच्या विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची गरज आहे.

अशा प्रकारच्या निषेधाचा ठराव करणारा अहिल्यानगर जिल्हा राज्यातील एकमेव असल्याचे ॲड. सुरेश लगड यांनी सांगितले. उपस्थितांनी देखील या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करुन संतापजनक भावना व्यक्त केल्या.

# राहुरी कारखान्याचा बॉयलर पेटविणारच- तनपुरे

**राहुरी । शफीक बागवान**



जिल्ह्यातील सर्वच नेत्यांना तनपुरे उन साखर कारखाना अरुण तनपुरे काय कोणीच सुरू करू शकत नाही असे वाटते. मात्र हा कारखाना सुरू करण्याचा शिवधनुष्य मी उचलला असून कारखान्याचा बॉयलर पेटविल्या शिवाय स्वस्थ बसणार नाही. मात्र सभासद व कामगारांनी साथ द्यावी, असे आवाहन राहुरी बाजार समितीचे सभापती तथा जनसेवा मंडळाचे प्रमुख अरुण तनपुरे यांनी केले आहे. राहुरीच्या तनपुरे साखर कारखान्याची निवडणूक ३१ मे रोजी होत असून या पार्श्वभूमीवर तनपुरे साखर कारखाना कामगारांनी तिन्ही पॅनल प्रमुखांना काल ता. २१ मे २०२५ रोजी सकाळी कारखाना कार्यस्थळावरील लक्ष्मी नारायण मंदिरात भूमिका मांडण्यासाठी आमंत्रित केले होते. त्यानुसार अरुण तनपुरे यांनी दाखल होऊन आपली भूमिका कामगारांपुढे मांडली. यावेळी युनियनचे अध्यक्ष गजानन निमसे, सेकेट्री सचिन काळे, अर्जुन दुशिंग, इंद्रभान पेरणे, सीताराम नालकर, बाळासाहेब तारडे आदींसह युनियनचे पदाधिकारी व कामगार बांधव मोठ्या संख्यने उपस्थित होते. पुढे बोलताना तनपुरे म्हणाले की, मला राहुरीकरांनी नगरसेवक, नगराध्यक्ष, बाजार समिती सभापती, जिल्हा बँक संचालक आदी पदांवर काम करण्याची संधी दिली आहे. मला पदाची लालच नाही, फक्त जनतेसाठी प्रामाणिकपणे काम करणे हाच हेतू आहे. राहुरी बाजार समितीत काम करत असताना आदर्शवत काम करत आलो असून बाजार समिती मार्फत पेट्रोल पंप सुरू केला. येत्या काळात जनावरांचा बाजार, फळांचा लिलाव मोंढा सुरू केला जाणार आहे. डॉ. बाबुराव तनपुरे यांनी सुरू केलेल्या संस्था उर्जितावसस्थेत आणण्यासाठी मी तनपूरे परिवाराचा सदस्य या नात्याने पुढे आलो आहे. कारखान्याचे तनपुरे परिवाराशी भावनीक नातं आहे. सभासद व नेत्यांना वाऱ्यावर न सोडण्याची भूमिका आमची आहे. काही झाले तरी हा कारखाना सुरू करायचा ही माझी धारणा आहे. त्यासाठी सभासद व कामगारांनी साथ द्यावी, असे आवाहन अरुण तनपुरे यांनी केले.



# भूमिहीन आदिवासी पारधी समाजाच्या घरांवर टांगती तलवार

## कारवाई स्थगित करा किंवा पर्यायी जागा देण्याची मागणी

**श्रीगोंदा । प्रतिनिधी**

तालुक्यातील पिंपळगाव पिसा (शेंडगे वस्ती) येथे गट नंबर ८४ मधील शासकीय गायरान जमिनीवर मागील तीन पिढ्यांपासून राहत असलेल्या भूमिहीन आदिवासी पारधी समाजाच्या कुटुंबीयांना ग्रामपंचायतीकडून घरे पाडण्याच्या नोटीसा देण्यात आल्याने परिसरात तीव्र संतापाचे वातावरण आहे. भर पावसाळ्यात अशा प्रकारे घरांवर कारवाई करण्यासंदर्भात पीडित कुटुंबीयांनी तीव्र नाराजी व्यक्त करुन, प्रशासनाकडे तात्काळ कारवाईला स्थगिती देण्याची मागणी केली आहे. याबाबत पीडित कुटुंबीयांच्या वतीने प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी अरुण उंडे यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले. आदिवासी पारधी कुटुंबीयांच्या मागणीला बहुजन समाज पार्टीच्या वतीने पाठिंबा देण्यात आला आहे. यावेळी यावेळी सुमन भोसले, सुवर्णा भोसले, रवी पवार, गोपीनाथ भोसले, कार्तिक भोसले, बहुजन समाज पार्टीचे जिल्हा प्रभारी सुनील ओहळ, जिल्हा उपाध्यक्ष शहानवाज शेख, माजी जिल्हाध्यक्ष उमाशंकर यादव, विधानसभा अध्यक्ष बाळासाहेब काते, जिल्हा महासचिव राजू शिंदे, योगेश खेंडके आदी उपस्थित होते. या निवेदनाद्वारे त्यांनी पर्यायी जागा उपलब्ध करून त्या ठिकाणी घरे बांधून द्यावीत, अशी मागणी केली आहे. अन्यथा आम्हाला राहण्यासाठी दुसरे ठिकाण नसल्याने आणि सध्याच्या पावसाळी परिस्थितीत लेकराबाळांना घेऊन घर सोडणे अशक्य असल्याने जबरदस्तीने कारवाई झाली तर आत्महत्येशिवाय पर्याय उरणार नसल्याचे भावनिक आवाहन केले आहे. ग्रामपंचायतीने केवळ आदिवासी पारधी समाजाच्या कुटुंबांना जागा खाली करण्याच्या नोटीसा देण्यात आल्या आहेत. त्याच गटांमध्ये इतर समाजाची घरे असताना केवळ पारधी समाजावरच ही कारवाई होणे अन्यायकारक असल्याचे मत या वेळी व्यक्त करण्यात आले. त्यामुळे ही कारवाई पक्षपाती असल्याचा आरोप करण्यात आला आहे. शासनाने या कारवाईला स्थगिती न दिल्यास व पर्यायी जागा उपलब्ध करून दिली नाही, तर २७ मे पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कुटुंबीयांसह बेमुदत उपोषण करण्यात येईल, असा इशारा पीडित कुटुंबीयांसह बसपाच्या वतीने देण्यात आला आहे.

# जिल्हास्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेचे आयोजन

**अहमदनगर । प्रतिनिधी**



जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनच्या वतीने १६ वर्षांवरील पुरुष व महिला खुल्या गटातील मैदानी ॲथलेटिक्स स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन ता. १ जून रोजी सकाळी ८ वाजता लोणी येथील पी. व्ही. पाटील (सिनियर) महाविद्यालयाच्या मैदानावर होणार आहे. या स्पर्धेत जिल्ह्यातील सर्व खेळाडूंना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले असून, ही स्पर्धा फक्त जिल्ह्यातील खेळाडूंसाठी मर्यादित आहे. स्पर्धेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे विजेते खेळाडू गुणवत्ता प्रमाणपत्राच्या मानकरी ठरणार आहेत. याशिवाय, या गुणवंत खेळाडूंची पुढील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड केली जाणार आहे. या खुल्या ॲथलेटिक्स स्पर्धेत पुढील क्रीडा प्रकारांचा समावेश आहे: धावणे- १०० मीटर, २०० मीटर, ४०० मीटर, ८०० मीटर, १५०० मीटर, ५००० मीटर, १०००० मीटर, चालणे, गोळाफेक, थाळीफेक, भालाफेक, हातोडाफेक आणि लांबउडी, तिहेरी उडी ई. क्रीडा प्रकारांचा समावेश आहे. राज्यस्तरीय स्पर्धा २१ ते २२ जून दरम्यान पुणे किंवा मुंबई येथे आयोजित केली जाणार आहे. राज्य गुणवत्ता प्रमाणपत्र ५% नोकरी राखीव कोट्यात उपयोगी ठरणार आहे. तसेच, राज्य व जिल्हा स्तरावरील सहभाग प्रमाणपत्र लष्कर भरती प्रक्रियेसाठी पात्र ठरणार आहे. प्रवेश अर्ज ऑफलाइन पद्धतीने स्वीकारले जाणार असून, स्पर्धेच्या दिवशी सकाळी ८ वाजेपर्यंत अर्ज सादर करणे आवश्यक आहे. सर्व खेळाडूंनी ओरिजिनल आधार कार्ड अनिवार्यपणे सोबत आणावे. भालाफेक व हातोडाफेक या प्रकारात सहभागी होणाऱ्या खेळाडूंनी स्वतःचा भाला व हातोडा बरोबर आणणे बंधनकारक आहे. अधिक माहितीसाठी दिनेश भालेराव: ९२२६२३८५३६, राहुल काळे: ८८३०८६३११६ व संदीप हारदे: ९६५७६०३७३२ यांच्याशी संपर्क करण्याचे आवाहन केले आहे.

# सोमनाथ घार्गे नवीन पोलिस अधीक्षक

**मुंबई । प्रतिनिधी**



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची घोषणा होण्याआधीच राज्य सरकारकडून पोलिस प्रशासनात मोठ्या प्रमाणावर बदल करण्यात आले आहेत. गुरुवारी एकूण २१ वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असून, अनेक जिल्ह्यांना नवीन पोलिस अधीक्षक मिळाले आहेत. या बदल्यांमध्ये सोमनाथ घार्गे यांची अहिल्यानगरचे नवीन पोलिस अधीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. घार्गे हे पूर्वी श्रीरामपूर येथे डीवायएसपी होते. याशिवाय, आंचल दलाल यांची रायगड जिल्ह्याच्या पोलिस अधीक्षकपदी, तुषार दोशी यांची सातारा जिल्ह्यात, नितीन बगाते यांची रत्नागिरीत, रितू खोकर यांची धाराशिव जिल्ह्यात, तर जयंत मीना यांची लातूर जिल्ह्यात पोलिस अधीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. अर्चित चांडक यांच्याकडे अकोल्याचे, तर योगेश कुमार गुप्ता यांच्याकडे कोल्हापूर जिल्ह्याचे पोलिस अधीक्षकपद सोपवण्यात आले आहे.



# महात्मा व सावित्रीमाई फुले यांच्या पुतळ्यांना केले भुजबळांनी अभिवादन

**नाशिक । प्रतिनिधी**

शहरातून येवला- लासलगाव मतदारसंघाकडे जाण्यासाठी प्रस्थान करण्यापूर्वी आपल्या नाशिकच्या एमईटी शिक्षण संकुलात सदिच्छा भेट दिली आणि क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या पुतळ्यांना अभिवादन केले. याप्रसंगी संस्थेतील विविध विद्याशाखांचे प्राचार्य, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी अतिशय आपुलकीने स्वागत केले. तसेच मंत्रिपदाची शपथ घेतल्याबद्दल रोपटे देऊन सत्कार करत अभिनंदन केले.

भा.पा. हिवाळे शिक्षण संस्थेचे
ग्रामीण विकास व अध्ययन केंद्र,
समाजकार्य व संशोधन संस्था, अहिल्यानगर
शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी प्रवेश सुरु

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न अभ्यासक्रम
मास्टर्स ऑफ सोशल वर्क (MSW)
पात्रता: मान्यताप्राप्त विद्यापीठातील कोणत्याही शाखेचा पदवीधर
बॅचलर इन जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन (BJMC)
पात्रता: 12वी उत्तीर्ण किंवा कोणत्याही शाखेचा डिप्लोमा
डिप्लोमा इन डिजास्टर मॅनेजमेंट (DDM)
पात्रता: 12वी उत्तीर्ण किंवा कोणत्याही शाखेचा डिप्लोमा
-प्रवेशासाठी संपर्क -
सीएसआरडी कॅम्पस,
अहमदनगर महाविद्यालया समोर, स्टेशन रोड, अहिल्यानगर - ४१४००१
०२४१ २३४६३२८ csrd.iswr@gmail.com www.csrd.edu.in